महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**परिमंडल कार्यालयाची जाहिरात क्र. ०१/२०१७ अंतर्गत सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) पदावर नेमणुक करण्यासाठी तात्पुरती निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याबाबत.**

**संदर्भ: दि. १८.०९.२०१७ रोजी परिमंडलनिहाय प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा यादया**

---

महापारेषण कंपनीच्या विविध कार्यालयांनी प्रसारीत केलेल्या जाहिरात क्र. ०१/२०१७ अन्वये सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदासाठी दिनांक १८.०९.२०१७ रोजीच्या सूचनापत्राद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड/प्रतिक्षा यादयांमधील उमेदवारांना सदर सूचनापत्रातील अटी व शर्तींच्या आधीन राहून मुळ कागदपत्रांच्या पडताळणी करीता बोलविण्यात येत आहे.

२. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सदरहू सूचनापत्रात नमूद केलेल्या **परिमंडलनिहाय तात्पुरत्या निवडयादीतील उमेदवारांनी दि. २७.०९.२०१७ ते २९.०९.२०१७ रोजी संबंधित परिमंडल** कार्यालयात खाली नमूद केलेले **मुळ कागदपत्र व त्यांच्या साक्षांकित छायाप्रतींच्या एका संचासह** कार्यालयीन वेळेत हजर राहून कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे.

- शिकाऊ उमेदवारी कायदा-१९६१ अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले **सर्वेक्षण (Surveyor)** या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र.

  **किंवा**

  औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून **सर्वेक्षण (Surveyor)** व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले **सर्वेक्षण (Surveyor)** या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र.
- सर्वेक्षण (Surveyor) या क्षेत्रातील २ वर्षाचा कामाचे अनुभव प्रमाणपत्र
- जन्मतारीखेकरीता एस.एस.सी. प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला.
- जातीचा दाखला ( मागास प्रवर्गातून अर्ज केला असल्यास )
- जाती वैधता प्रमाणपत्र ( असल्यास - मागास प्रवर्गातून अर्ज केला असल्यास )
- नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र, (मागास/ महिला प्रवर्गातून अर्ज केला असल्यास - अ.जा. व अ.ज.यांना वगळून)
- अधिवास प्रमाणपत्र
- नावातील बदलाचे प्रमाणपत्र (नावात बदल केला असल्यास)
- मराठी भाषा प्रमाणपत्र (जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे)
- शासकीय / निमशासकीय सेवेत / शासकीय उपक्रमात कार्यरत असल्यास संस्थेचे / कंपनीचे ना हरकत प्रमाणपत्र

३. कागदपत्र पडताळणीस हजर राहण्याबाबत प्रत्येक उमेदवारास त्याने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यांवर पत्र पाठविण्यात येत आहे. पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची पोच ई-मेलद्वारे देण्यात यावी. तसेच, अर्जात नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर देखील कळविण्यात येत आहे.

४. जर सदर पडताळणी करीता उमेदवार हजर न राहिल्यास सदर उमेदवार निवडीकरिता पात्र समजला जाणार नाही याची कृपया गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

**५. कागदपत्र पडताळणीकरीता उमेदवारास बोलविण्यात आले म्हणून त्यांना नेमणूक मिळण्याबाबतचा कोणत्याही प्रकारचा हक्क प्राप्त होत नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**६. तात्पुरत्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संबंधित परिमंडल कार्यालयाकडून आवश्यकता असल्यास सुचित केले जाईल. त्यामुळे त्यांनी परिमंडल कार्यालय किंवा मुख्य कार्यालयास संपर्क करु नये.**

S/d

**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**दिनांक:-२२.०९.२०१७**

**स्थळ :मुंबई**

******

f:\hr-rc\advt no. 01-2017\zonal advertisement\post result communication\doc verification notification.doc